REVIEW OF RESEARCH

# मुघलकालीन जमीन व कागद यांचा ऐतिहासिक संबंध: एक अभ्यास

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



प्रा. गोवर्धन कृष्णाहरी दिकोंडा

सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, माढा ता. माढा, जि. सोलापूर.

**गोषवारा :**

प्राचीन काळापासून ते आजतागायत जमीन हे नेहमीच सर्वाधिकयुद्ध, भांडणे, तंटा, वाद यात केंद्रीभूत झालेले घटक आहे जमिनीवर वर्चस्व गाजवणे, त्यावर कर आकारणे, त्यासाठी नागरिकांवर बंधने आणणे असे अनेक प्रकार आजतागायत चालू आहे. जसजसे जमिनीचे किंमत शासनकर्त्यांना समजले तसे त्यांनी आपले सार्वभौमत्व प्रस्थापित केले. काही शासनकर्त्यांनी जमीन इनाम, वतन आणि अग्रहार म्हणून दान दिली आणि काही शासनकर्त्यांनी दान दिलेली जमीन पुन्हा परत घेतल्याचे निदर्शनास आले. काही शासनकर्त्यांनी शेतकऱ्यांना त्यांचे शेती किती आहे आणि ते कोणते पीक घेत जात आहेत व त्यांच्यावर किती कर आकारले जावे यासठी स्वतंत्रपणे एका कागदाच्या तुकडयावर लिहून दिले आहे त्यास पट्टी असे म्हणत. शासनकर्ते आणि शेतकरी यांच्यात फसवणूक होऊ नये म्हणून त्यांच्यात करारनामा कबुलीयत करून घेतले असल्याचे दिसून आले जमिनीच्या कराव्यतिरिक्त घर, चराई यांच्यावरही कर आकारणी केली.

**प्रमुख शब्द** : जमीन, महसूल, इनाम, वतन, अग्रहार, करारनामा, कबुलीयत, पट्टा

प्राचीन काळापासून आजतागायत सर्वाधिक युद्ध, भांडणे, तंटा, वाद हे सर्व फक्त आणि फक्त जमीन या भूभागामुळे झाले आहेत आणि आजही होत आहेत. आज पृथ्वीवरील जमिनी व्यतिरिक्त चंद्र आणि मंगळ या ग्रहावर काही प्रगत देशांनी उपग्रहे पाठवून त्याठिकाणी आपले ध्वज रोवून तेथील जमीनीवर हक्क आणि अधिकार गाजवण्यास आरंभ केला आहे.

नवाश्मयुगापासून मानव स्थिर जीवन जगण्यास सुरुवात केली. तेथूनच जमीन या घटकावर मानव सर्वाधिकार गाजवण्यास सुरुवात केली असे म्हणावयास हरकत नाही. मानवाला स्थैर्य प्राप्त झाल्याने तो स्वत:च्या संरक्षणासह आपल्यासोबत राहणाऱ्या इतरांचेही संरक्षण बाबत विचार केले असल्याने त्यांनी संरक्षणाचे महत्त्वाचे घटक म्हणजे जमीन. आपण राहत असलेल्या जागेच्या अवती भोवती संरक्षणाचे कुंपण किंवा तटबंदी उभारले तर आपल्याला शांतीने व स्थिर जीवन जगता येईल याची जाणीव झाली. तसेच यासाठी सर्वांचे एकोपा असणे आवश्यक आहे आणि यासाठी कायमस्वरूपी यावर नियंत्रण, देखरेख ठेवणे, संरक्षण करणे महत्त्वाचे असल्याने तत्कालीन विचारवंतांनी सर्वांच्या संमतीने एक नियंत्रक नेमला पुढे त्याचे जबाबदारी वाढत गेल्याने तसेच जबाबदारी पूर्तता करणेसाठी अर्थ लागत असल्याने त्यांनी सर्वप्रथम संपूर्ण जमिनीवर मालकी हक्क प्रस्थापित करून आपल्या नागरिकांकडे असलेल्या जमिनीवर कर रूपात अर्थ गोळा करण्यास सुरुवात केली. यास ‘महसूल’ असे म्हणत. जमिनीच्या नियंत्रकास ‘राजा’ हा शब्द प्राप्त झाला. मौर्यांच्या काळात खाजगी आणि सरकारी असे दोन प्रकारचे शेती होती. त्यापैकी सरकारच्या मालकीची शेती जास्त होती. सरकारच्या मालकीची शेती जास्त असल्याने त्यावर देखरेख ठेवण्यासाठी तत्कालीन शासकांनी ‘सीताध्यक्ष’ नावाचा स्वतंत्र अधिकारी नेमले होते.[१] सीताध्यक्षावर जबाबदारी होती की, त्यांनी शेतीविषयक प्रगत ज्ञानाचा उपयोग करून सरकारी उत्पन्नात वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे. सीताध्यक्ष प्रमाणे कृषी अधिक्षक नेमणूक केल्याने मौर्यांची सत्ता बळकट, स्थैर्य प्राप्त होण्यास महत्त्वाचा घटक म्हणजे जमीन होता हे दिसून येते.[२]

सातवाहन काळात जमीन दान देण्याची प्रथा सुरू झाली असल्याचे दिसून येते[३] सातवाहन राजांनी ब्राह्मण आणि बौद्ध साधू यांना जमीन दान दिल्याचे निदर्शनास येते.[४] दान दिलेल्या जमिनी या करमुक्त असत आणि त्यांना कोणतेही शासकीय बंधने लागू नव्हतीअशा भूमिदानाचा पहिला शिलालेख इसवी सन पूर्व पहिल्या शतकात सातवाहनांच्या काळातील असल्याचे दिसून येते शिलालेखात 'ब्राह्मणांनी वैदिक यज्ञात पौरोहित्य केल्याबद्दल त्यांना सातवाहनांनी गावे दान दिली' असा उल्लेख आहे.[५] गुप्तांच्या काळात कमी प्रमाणात जमीन दान दिल्याचे दिसते. याउलट वाकटक राज्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात जमीन दान दिल्याचे आढळते. या दान दिलेल्या जमिनीत अग्रहार, इनाम असे प्रकार होते. साधारणपणे ब्राह्मण वर्गाला जे जमीन दान दिले जात त्यास 'अग्रहार' म्हणत असत. अग्रहार जमिनीवर आपली हुकूमत चालविण्याची मोकळीक होती.

इनाम म्हणजे उत्तकृष्ट कार्य केल्याबद्दल बक्षीस स्वरुपात वस्तू किंवा इतर घटक मिळविणे प्राचीन व मध्ययुगीन काळात तत्कालीन शासकांनी जमिनीच्या स्वरुपात इनाम दिल्याचे उल्लेख आढळतात. ज्यांना इनाम स्वरुपात जमीन दान रूपात प्राप्त झालेले आहे त्यांना जमीनीवरील महसूल वसूल करण्याचे आणि त्यावर कारभार करण्याचे हक्कही त्यांना मिळत होते इनामाने प्राप्त झालेली जमिनी ही कायम स्वरूपाची म्हणजे वंशपरंपरेने चालणारी होती तसेच त्यांना प्राप्तझालेल्या जमिनीवर जे नागरिक राहत असत ते इनामदार यांनाच कर द्यावे असे 'राजाज्ञा' होती.

अशा दान दिलेल्या जमिनीमुळे संरजामशाहीला वाव मिळाला याशिवाय मोठ्या प्रमाणात कर मिळावे म्हणून इनामदार गावातील नागरिकांवर जुलूम केल्याचे आढळत असत महसूल, न्यायदान, व गावाचे संरक्षण हे सर्वाधिकार दान घेतलेल्या इनामदारांना प्राप्त झाल्याने राजसत्ता कमकुवत झाली.

मध्ययुगीन काळात अल्लाउद्दीन खिलजीने महसूल व राज्याच्या उत्पन्न वाढीसाठी राज्याचा आढावा घेतला असता शेतसारा पद्धती, आर्थिक सुधारणा यात बदल करणे तसेच जास्तीत जास्त जमीन सरकारच्या ताब्यात असणे आवश्यक होते. त्यांनी यापूर्वी सरकारच्या वतीने अमीर, सरदार, सरकारी कर्मचारी, मुल्ला मौलवी यांना जे वतन म्हणून जमीन देण्यात आल्या होत्या त्या सर्व परत घेतल्याच्या दिसून येते. वतन जमिनी हे करमुक्त असल्याने सरकारला त्याचे कोणतेही फायदे होत नाही. उलट सरकारचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान लक्षात आल्याने त्यांनी वतन जमिनी परत घेतल्या यात फक्त महसूल अधिकाऱ्यांचे वतने काढून घेतली मात्र लष्कर अधिकाऱ्यांची वतने पूर्ववत चालू ठेवली फक्त नवीन वतने देणे मात्र टाळले

अल्लाउद्दीन खिलजीने सर्वप्रथम शेतसारा पद्धतीत आणि आर्थिक सुधारणेमध्ये मोठ्या प्रमाणात आमुलाग्र बदल केले शेतसारामध्ये एकूण उत्पादनाच्या पन्नास टक्के शेतसारा निश्चित केल्याचे एक कागदी स्वरुपात शासकीय आदेश किंवा अध्यादेश काढल्याचे दिसून येते.[६] याशिवाय महसूल वाढीसाठी घरपट्टी व चराईपट्टी असे दोन नवीन कर आपल्या नागरिकांवर लादले पट्टी म्हणजे कागदाचा तुकडा त्यावर विविध प्रकारचे करांची नवे असत कर आकारणीच्या कार्यप्रणालीवर देखरेख करिता 'शाहना-ए-मंडी' व 'दिवाण-ए-रियासत' असे दोन स्वतंत्र विभाग निर्माण केले.[७] या विभागावरून स्पष्ट होते की, या कार्यालयात लेखन साधन म्हणून कागद सहज आणि सुलभतेने उपलब्ध असल्याने असे दोन विभाग निर्माण केल्याचे दिसून येते

शेरशहा सूरी हा मध्ययुगीन कालखंडातील उत्तम प्रशासक म्हणून प्रसिद्ध होता म्हणूनच त्याला सम्राट अकबराने जेजे प्रशासनिक सुधारणा केली त्याचा पूर्व सूरी असे म्हटले जाते शेरशहाने सत्तेवर येताच आपल्या ताब्यातील साम्राज्यातील संपूर्ण जमिनीची मोजणी केली होती. जमिनीचे उत्कृष्ट, मध्यम व निकृष्ट अशा तीन विभागात वर्गीकरण करण्यात आले. यासाठी त्याने सिकंदर लोदीच्या काळातील 'गज' ह्या मोजमापन पद्धतीचा वापर केला. यामुळे शेतकऱ्यांकडून किती महसूल घ्यावयाचा हे त्यास माहिती प्राप्त झाली शेरशहा सूरी हे करत असताना लेखन साधन म्हणून कागदाचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला. त्याने प्रत्येक शेतकऱ्याकडून त्याच्या जवळ असलेल्या जमिनीची संपूर्ण माहिती आणि त्याला द्यावा लागणारा महसूल हे निश्चित करून त्याबाबतचा 'करारनामा' लिहून घेतला जात होता, याला 'कबुलियत' असे म्हणत.[८] यावरून हे स्पष्ट होते की, निश्चित महसूल प्राप्त होणेसाठी राजा व प्रजा यांच्यात करार केलेली आहे हा करार अंमलात येणेसाठी त्यांनी प्रत्येक शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा मालकी हक्क दाखविणारा एका कागदाच्या तुकड्यावर जमिनीचे तपशीलवार माहिती लिखित स्वरुपात देत असे. त्यास 'पट्टा' पद्धत म्हणत. 'अमीन' हा सरकारी अधिकारी प्रत्येक शेतकऱ्याला 'पट्टा' उपलब्ध करून देत असे.

शेरशहाने कागदाचा सुयोग्य उपयोग करत त्यांनी भारतात जमीन महसुलीची 'झब्त पद्धत' क्रमाक्रमाने अंमलात आणली आणि सम्राट अकबराने ती पूर्णत्वास नेली प्रत्यक्ष जमिनीची मोजमाप करणे आणि अशा मोजमापावर आधारित जमीन महसुलाची रोख रकमेत आकारणी निश्चित करणे. ही झब्त पद्धतीची दोन वैशिष्ट्ये होती. जमिनीचे पोलज, परौती, चाचर आणि बंजर असे प्रकार किंवा विभागणी

केली. मुघल साम्राज्यात जमीन महसूल हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्याने त्यांनी प्रत्येक खेड्यावर मुकदम व पटवारी असे दोन महसूल अधिकारी नेमले.[९] सम्राट अकबराने परगण्याचा प्रशासकीय प्रमुख म्हणून 'अमील' या अधिकाऱ्याची नेमणूक केली. त्यास 'अमील-ए-गुझर' किंवा 'करोरी' असेही म्हणत असे.[१०] त्यास परगण्यामध्ये लागवडी योग्य असलेली कोणतीही जमीन पडीक राहू न देणे, आपल्या विभागातील जमीन महसूल जमा करणे, हिशेबाच्या नोंदी ठेवणे तसेच महसुलाच्या कामाची स्थानिक कागदपत्रे काळजीपूर्वक राखून ठेवणे ही प्रमुख जबाबदारी होती. जमीनीत असलेल्या विविध हितसंबंधाची नोंद, आकारणीचे निश्चित केलेले विविध दर या बाबींची नोंद त्याकडे होती. दस्तुर-उल-अमल, जमदमीच्या रकमा, मदद-ए-माश, जमिनी या सारख्या इतर अनेक नोंदवह्या त्याच्याकडे असत. जमिनीची विक्री, जमिनीचे इनाम, जमिनीचे भाडेपट्टे व गहाणखत अशा प्रकारच्या जमीनविषयक सर्व व्यवहारांचे नेहमीच नोंद ठेवत असल्याने त्याला त्याचे पूर्ण ज्ञान होते.[११]

## निष्कर्ष :

प्राचीन काळापासून ते आजतागायत जमीन हे नेहमीच सर्वाधिक युद्ध भांडणे, तंटा, वाद यात केंद्रीभूत झालेले घटक आहे जमिनीवरील मालकी हक्क व अधिकारचे जे भांडणे, तंटा, वाद आहेत ते आजही तसेच आहे परंतु सल्तनत काळापासून जमिनीचे क्षेत्रफळ, त्यावरील कर जे कागदावर नोंद होण्यास सुरुवात झाली तेव्हापासून शासनकर्त्यांना त्यांचे निश्चित आणि नियमित महसूल वाढ झाले असे म्हणावयास हरकत नाही. कागदावरील सुस्पष्ट नोंदीमुळे त्या काळातील सामान्य नागरिक किंवा शेतकरी यांचे जे जमिनीवरील मालकी हक्क संदर्भात भांडणे, तंटा, वाद असत. ते कागदाच्या पुराव्यामुळे इतरांचे जे लबाडीखोटेपणे दावा करत असत त्यांचे लबाडी, खोटेपणा उघडकीस आणले असे म्हणण्यास हरकत नाही.

## संदर्भ :


१. D. N. Jha, Ancient India in Historical Outline, Reprint, Manohar Publications, Delhi, 2000, p. 97

२. Ibid.

३. डी. एन. झा, के. श्रीमाली, प्राचीन भारत का इतिहास, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २००९, पृ. २३९

४. डी. एन. झा, प्राचीन भारत ऐतिहासिक रूपरेषा, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे, २००२, पृ. ११५

५. कित्ता

६. हरिशचंद्र वर्मा (संपा) मध्यकालीन भारत, भाग – २, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली, २०११, पृ. ३२.

७. सतीश चंद्र, मध्यकालीन भारत, जवाहर पब्लिशर्स, दिल्ली, २००८, पृ. ७५

८. सिद्दिकी एन. ए., सासवडकर प्र. ल. (अनुवादक), (२००६), मोगलकालीन महसूल पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, पृ. १८६-१८७

९. कित्ता, पृ. १८६-१८७

१०. कित्ता, पृ. १८६-१८७

११. कित्ता, पृ. १८६-१८७